दै. देशोन्नती दि. 09/08/25



# चोरी प्रकरणातील दोन आरोपी विमानतळ पोलिसांच्या ताब्यात

## १० लाखांचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन



**नांदेड :** पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सूरू केलेल्या ऑपरेशन फ्लॅशआऊट अंतर्गत गुन्हे उघडकीस आणण्यासाठी विमानतळ पोलिसांनी केलेल्या कारवाईत दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून सोन्याचे दागिने व मोटारसायकल असा एकूण १० लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आयोजित पत्रकार परिषदेत शुक्रवारी दिली.

विमानतळ पोलिस ठाण्याच्या हद्दीत ३० जुलै रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास उर्मिला लक्ष्मणराय सोनटक्के (५५) रा नाईकनगर या त्यांच्या मुलीसोबत शतपावली करीत असतांना दोन अनोळखी इसमांनी मोटारसायकालवर येवून त्यांच्या गळयातील सोन्याची चैन जबरीने चोरून नेली. याप्रकरणी विमानतळ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवुन विमानतळ येथील पोलीस निरीक्षक सितांबर कामठेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस अधिकारी, अंमलदार यांनी सदर गुन्ह्या संबंधाने सिसिटीव्ही फुटेज तपासले, तांत्रिक मदत घेत तपास करीत असतांना त्यांना आसना ब्रिजखाली दोन इसम हे संशयीतरित्या थांबलेले असल्याची माहिती मिळाली. या माहितीवरून सदर ठिकाणी जावुन महेश बबन देवकत्ते (२६) रा. आंबानगर सांगवी व सय्यद जाकेर सय्यद जफर (२८) रा. महेबुबनगर यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. संशयावरुन सदर दोन्ही आरोपींना विमानतळ पोलिस ठाण्यात आणून त्यांना विश्वासात घेवून चौकशी केली असता सदर दोन्ही आरोपींनी वरील नमुदप्रमाणे गुन्हे केल्याची कबुली दिली. यावेळी विमानतळ ठाण्याचे पोनि सीतांबर कामठेवाड, स्थागुशाचे पोनि उदय खंडेराय उपस्थित होते. या कारवाई पथकात सपोनि संतोष जोंधळे, पोहेकॉ बालाजी पांचाळ, शेख शोएब, राजेश माने आदींचा समावेश होता.

### आरोपींना दोन दिवसाची पोलिस कोठडी

यामध्ये त्यांना गुन्ह्यात अटक करुन न्यायालयासमक्ष हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. पोलिसांनी आरोपींकडून सोन्याचे दागिने एकूण ८२ ग्रॅम वजनाचे व गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण १० लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केल्याचे पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले.